01:26:20 PM

नि. दि. दावा क्र. ४८/२०१४

शिवाजी वि. सोपान

**निशाणी क्र. ५० लगत**

**वादीतर्फे साक्षीदार क्रं.१ चा पुढील उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ एम.एम.भारूका यांच्यामार्फत**

९. गावापासून नावडीपर्यंत जाणारा रस्ता अंदाजे १०० वर्षापासून आहे. हे खरे आहे की, रस्ता नावडीकडून रेलकडे येतो व रेलच्या गावठण हद्दीत एक चौक आहे तिथे मिळतो. हे खरे आहे की, त्या चौकापासून एक रस्ता उत्तर बाजुला अंधानेरकडे जातो. चौकाच्या पश्चिम बाजुला गट क्र.८५ आणि ३३४ आहे. चौकाच्या पूर्वेला गाव आहे. दक्षिणेला शाळेकडे जाणारा रस्ता आहे आणि उत्तरेकडे अंधानेरकडे जाणारा रस्ता आहे. सदर चौक गावठाणात आहे व तो कोणत्याही सर्वे नंबरच्या जमिनीत नाही. भवानी मंदिर हे गट क्र.३३४ मध्ये आहे. गट क्र.३३४ च्या पूर्वेला अंधानेर रस्ता, पश्चिमेला सुलोचना विठ्ठल जंगले यांची गट क्र.३३३ ची जमीन, दक्षिणेला नावडीला जाणारा रस्ता आणि उत्तरेला गट क्र.३३४ च्या भाऊबंदाची जमीन आहे. त्याचा गट क्रमांक वेगळा आहे. चौ रस्त्याच्या मध्ये काही नाही. मोकळी जागा नाही.

१०. हे खरे नाही की, आसाराम रंभाजी नागे यांची ग्रामपंचायत मिळकत क्र.२२७ ही चौ रस्त्याजवळ आहे. मला हे सांगता येणार नाही की, आसाराम रंभाजी नागे यांची मिळकत क्र.२२७ आहे किंवा कसे. मला सांगता येणार नाही की, आसाराम रंभाजी नागे यांची मिळकत गावठाणात आहे किंवा कसे. हे खरे आहे की, आसाराम रंभाजी नागे यांच्या पूर्वेकडे आणि दक्षिणेकडे रस्ता आहे.

प्रश्न– त्यांच्या मिळकतीच्या पश्चिमेकडे भवानी मंदिर आहे

उत्तर– मला त्याचे उत्तर द्यायचे नाही.

प्रश्न– त्यांच्या मिळकतीच्या उत्तरेस त्यांचे भाऊ परसराम रंभाजी नागे यांचे घर आहे

उत्तर–मला त्याचे उत्तर द्यायचे नाही.

११. मला हे सांगता येणार नाही की, आसाराम रंभाजी नागे यांची जमीन

१८९ चौ.मी. होती किंवा कसे. मला हे सांगता येणार नाही की, सदर मिळकत सोपान आणि सोमिनाथ यांना नोंदणीकृत खरेदीखत क्र.२४३१ दि.२४.०५.२००० अन्वये खरेदी दिली आहे किंवा कसे. हे खरे नाही की, तेव्हापासून सदर जागा सोपान आणि सोमिनाथ यांच्या मालकी ताब्यात आहे. मला हे सांगता येणार नाही की, सदर मिळकतीचा घर क्र.२३३ आणि २३४ पडलेला आहे किंवा कसे. दावा दाखल करण्यापूर्वी मिळकतीची व त्याच्या कागदपत्रांची पडताळणी केलेली नाही. प्रतिवादीच्या मिळकतीचा उल्लेख दाव्यात केलेला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, मा.न्यायालयाची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने मिळकतीचा उल्लेख दाव्यात केला नाही.

१२. प्रतिवादी दि.०५.०३.२०१४ रोजी बांधकामाचे खड्डे खोदले होते. खड्डे जे.सी.बी.ने खोदले होते. आम्ही गेलो त्यावेळेस जे.सी.बी.थांबला नव्हता पळून गेला होता. मला दुरुन जे.सी.बी. जाताना दिसला. खड्डे खोदल्यापासून बांधकाम चालू होते. खड्डे खोदल्यापासून १ महिन्यात बांधकाम पूर्ण झाले. खड्डे खणले त्यावेळेस गावातील कोणीही लोक नव्हते. केवळ प्रतिवादी होते. मी प्रत्यक्ष खड्डे पाहिले होते.

१३. खड्डे कोणत्या मिळकतीमध्ये खोदण्यात आले व ते किती अंतरावर होते व त्याची लांबी रुंदी काय होती हे मला सांगता येणार नाही. मी खड्ड्यांचा फोटा काढला नाही. माझ्या तोंडी शब्दांव्यतिरिक्त खड्ड्यांबाबत अन्य कोणताही पुरावा नाही. खड्डे खणल्याबाबत ग्रामपंचायतला लेखी स्वरुपात अर्ज दिला होत. त्याची तारीख मला आठवत नाही. सदर कागद कोर्टात का दाखल केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी तहसिलदार यांच्याकडे अर्ज केला होत. त्याची तारीख मला सांगता येणार नाही. तो अर्ज कोर्टात का दाखल नाही केला याचे कारण मला सांगता येणार नाही.

१४. मला हे सांगता येणार नाही की, ग्रामपंचायतीने जागेवर जावून पंचनामा

केला किंवा कसे. आता मला निशाण ६७/४ वर दाखल असणारा पंचनामा झाला किंवा कसे याची मला माहिती नाही. माझ्या तक्रारी अर्जाची चौकशी मी ग्रामसेवकाकडे केली. त्यांनी मला पंचनाम्याबाबत काही सांगितले नाही. ते माझ्या अर्जाबाबत काही म्हणाले नाही. त्यांनी आम्हाला केवळ सही करुन दिली. हे खरे आहे की, प्रतिवादी यांना दि.१९.१२.२०१३ रोजी ग्रामपंचायतीने परवानगी दिलेली आहे. सदर साक्षीदार सांगतो की, सर्वप्रथम प्रकरण न्यायालयात चालल्यावर रद्द करण्यात येईल. आता मला दाखविण्यात आलेले निशाण ६७/२ वरील परवानगीचा कागद प्रतिवादींना ग्रामपंचायतीने दिलेला आहे. तो मला मान्य आहे. (साक्षीदाराला सदर कागद मान्य असल्यामुळे त्याला **निशाण क्र.७०** देण्यात येते.) मला हे सांगता येणार नाही की, त्यानंतर ग्रामपंचातीने प्रतिवादीचे बांधकाम सार्वजनिक रस्त्यावर नसल्याचे प्रमाणपत्र दिले किंवा कसे. प्रतिवादी हे सन २०१४ मध्ये दावा दाखल झाल्यानंतर एक महिन्यानंतर बांधकाम पूर्ण झाल्यानंतर राहायला गेले. प्रतिवादी हे सन २०१४ मध्ये नेमक्या कोणत्या महिन्यापासून राहतात हे मला सांगता येणार नाही.

प्रश्न– ग्रामपंचातीला त्या दाव्यामध्ये समाविष्ठ करणे गरजेचे होते

उत्तर– चार पाच सदस्य त्यांचे असल्यामुळे ग्रामपंचायत त्यांच्या दबावाखाली काम करते. त्यामुळे मी काहीही बोलू शकत नाही.

१५. मी ग्रामपंचातीबाबत वरीष्ठांकडे अर्ज केला नाही. आम्ही वरिष्ठकांकडे का तक्रार केली याचे कारण मला सांगता येणार नाही.

**दुपारची सुटी झाल्यामुळे उलटतपास दुपारच्या सुटीपर्यंत तहकूब.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2025.07.16 17:33:57 +0530

कन्नड. (वि. द. पाटील)

दिनांक : १६/०७/२०२५ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

02:03:37 PM कन्नड.

## CERTIFICATE

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | V. D. Khambat, (Grade-III) |
| Court | V. D. Patil, Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Kannad |
| Date | 16.07.2025 |
| Order signed by the Presiding Officer | 16.07.2025 |
| Order uploaded on | 16.07.2025 |